**प्रेसनोट दि. ११.०४.२०२३**

लोकसेवक श्री. शशिकांत ज्ञानदेव ओमासे, वय-४६ वर्षे, मंडल अधिकारी करंजे, ता. खानापूर जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३०००/- रूपये लाचेची रक्कम स्विकारली. तसेच लोकसेवक श्री. विजय शंकर ओमासे, वय-३६ पद- तलाठी करंजे यांनी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केल्याने त्यांचे विरुद्ध सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडील यांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीबाबत प्रांत कार्यालय विटा व दिवाणी न्यायालय सांगली मध्ये दावा दाखल होता. सदर दाव्याचा निकाल तक्रारदार यांचे बाजूने लागलेने सदर निकालपत्रान्वये ७/१२ सदरी तक्रारदार यांचे वडीलांचे नाव नोंद होणेकरीता तलाठी कार्यालय करंजे येथे अर्ज दिला होता. ७/१२ सदरी नोंद घेवून मंजूर करण्या करीता मंडल अधिकारी करंजे श्री. ओमासे यांनी स्वतः करीता व तलाठी करंजे श्री. विजय शंकर ओमासे यांचेकरीता तक्रारदार यांचेकडे ५०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.११.०४.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दि.११.०४.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. ओमासे मंडल अधिकारी यांनी स्वतः करीता व तलाठी करंजे श्री. विजय शंकर ओमासे यांचेकरीता तक्रारदार यांचे वडील यांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीची नोंद ७/१२ उताऱ्यावर करून देणेकरीता ५०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच लोकसेवक श्री. ओमासे मंडल अधिकारी यांचेविरूध्द तलाठी कार्यालय करंजे ता.खानापूर जि.सांगली या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. शशिकांत ज्ञानदेव ओमासे, वय-४६ वर्षे, मंडल अधिकारी करंजे, रा. टाटा शोरूम शेजारी कोल्हापूर रोड ज्ञानशा बंगला यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ३०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक श्री. विजय शंकर ओमासे, वय-३६ पद- तलाठी करंजे, यांनी देखील सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचेकडे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. दोन्ही लोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक शशिकांत ज्ञानदेव ओमासे, वय-४६ वर्षे, मंडल अधिकारी करंजे ता.खानापूर जि.सांगली, व लोकसेवक श्री.विजय शंकर ओमासे, वय-३६ पद- तलाठी करंजे यांचे विरुध्द विटा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील पोलीस उप अधीक्षक, श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार प्रितम चौगुले, अजित पाटील, सलिम मकानदार, उमेश जाधव, पोपट पाटील, हरीभाऊ वाघमोडे, रविंद्र धुमाळ, सिमा माने, चंद्रकांत जाधव, सुदर्शन पाटील, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner